जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 17/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 23.12.2021

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. जयश्री निलेश पावडे** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 31.12.2021 रोजी दुपारी 03.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

**विषय :- नांदेड कर्मचारी कल्याण निधीचा सुधारीत मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ:-** नांदेड वाघाळा शहर कर्मचारी कल्याण निधी सर्वसाधारण सभा ठराव क्र.15 दि.24.05.2002 व्दारे मंजुर उपविधीत मनपा ठराव क्र.108 दि.31.08.2013.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत विविध विभागात जवळपास 2300 कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामध्ये सदर पदांपैकी बरेचसे कर्मचारी हे साफसफाई, पाणीपुरवठा, मलनिस्सा:रण, करवसुली, अग्निशमन, वैद्यकीय सेवा इत्यादी विभागात कर्तव्य बजावत असतात. अत्यावश्यक काम करणारे कर्मचारी अनेक वेळेस छोटया-मोठया आजाराने त्रस्त होतात. सध्या तांत्रिक युग असून या युगात विविध यंत्रसामुग्री पासून जिविताचा धोका वाढला आहे. तसेच विविध आजार व अपघाताचे प्रमाण दिवसैंदिवस वाढत आहे. नांदेड महानगरपालिकेतील कर्मचारी विविध विभागा अंतर्गत अहोरात्र सेवा देतात.त्यामुळे या सेवा पार पाडत असतांना अनेक वेळेस दुर्दैवी प्रसंग ओढवतात.अशा प्रसंगी सदर कर्मचा-यास किंवा त्यांच्या कुटुंबीयास आर्थिक मदतीची मोठी गरज असते.परंतु यासाठी सध्या कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध नसल्यामुळे अनेक वेळेस कर्मचा-यांना आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागते. इतर विविध शासकीय कार्यालयात कर्मचारी कल्याण निधी स्थापन केलेला असून त्या सर्व कर्मचारी नियमीत दरमहा अल्पशी वर्गणी जमा करतात.या जमा होणा-या निधी मधून कर्मचा-यांचे अनेक प्रश्न मार्गी लागलेले आहेत. त्या अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी संघटनांनी वेळोवेळी दिलेल्या निवेदनानुसार नांदेड महानगरपालिकेतील कर्मचा-यांकरिता दि.24.05.2002 रोजी मनपा सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव क्र.15 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचारी कल्याणनिधी स्थापन करण्यात आला आहे. त्यामुळे अशा प्रकारचा निधी महापालिकेतील कर्मचा-यांच्या कल्याणाकरिता आवश्यक झालेला आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 66(18) नुसार ही

बाब महानगरपालिकेच्या ऐच्छिक कर्तव्यात मोडते कल्याण निधी स्थापन करुन चालणार नसुन त्यांचे कामकाज कसे असावे.वर्गणी कशी गोळा करावी,कार्यकारी मंडळ कसे असेल,निधीतून कोणकोणती कामे करता येतील इत्यादी बाबत नियम तयार करण्यात आले होते. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रारुप नियमामध्ये सुधारणा करणे योग्य राहिल.

**प्रारुप नियम**

1) संक्षिप्त नाव- या नियमास नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,कर्मचारी कल्याणनिधी नियम 2002 असे संबोधण्यात येईल.(सुधारणा-2021)

2) नियमाची व्याप्ती - हे नियम नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुळ आस्थापनेवरील कार्यरत व महानगरपालिका आयुक्तांच्या नियंत्रणाखालील सर्व संवर्गाच्या कर्मचा-यांना लागू राहतील. तथापि प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेत रूजू झालेले अधिकारी/कर्मचारी तसेच निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांना,मानधनतत्वावर कार्यरत कर्मचा-यांना हे नियम लागू राहणार नाहीत.

3) उद्दीष्टे- सदरील निधी महानगरपालिकेतील कर्मचा-यांना त्यांच्या कुटुंबीयांना पुढील नमूद प्रसंगी मदत करण्याकरीता उपयोगात आणण्यात येईल.कार्यकारी समितीच्या मान्यतेने मदत देण्यात येईल.

4) आजारी असल्यास त्यात दुर्धर आजाराकरीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत देण्यात येणा-या वैद्यकीय प्रतिपूर्ती व्यतिरिक्त इतर सर्व गंभीर व आकस्मिक आजाराकरीता अनुदान रुपये- 10,000 ते 40,000/- अनुज्ञये करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आजारांचे नांव |
|---|---|
| 1 | डोळयांसंदर्भात कोणत्याही प्रकारच्या शस्त्रक्रियेस लागू राहिल. |
| 2 | अपेंडिक्स,हर्निया व पोटातील कोणत्याही गाठीसंबंधीत शस्त्रक्रियेसाठी लागू राहिल. |
| 3 | अस्थीसंबंधी शस्त्रक्रिया (कोणत्याही हाडांची शस्त्रक्रिया) |
| 4 | अपघात झाल्यास,कायम अपंगत्व आल्यास ( जसे की शरीरातील एखादा अवयव नष्ट होणे)अनुदान रुपये 10,000/- ते 40,000/- अनुज्ञेय राहिल. |
| 5 | विविध आजाराच्या शस्त्रक्रियेसाठी लागू राहिल. |
| 6 | अधिकारी /कर्मचारी यांचा अचानक मृत्यू झाल्यास संबंधितांच्या पात्र वारसास अनुदान रू.10,000/- |
| 7 | प्रसुतीशस्त्रक्रिया (फक्त कायम महिला कर्मचारी व पुरुष कर्मचारी यांची पत्नी. ) यांच्यासाठी वैद्यकीय खर्च म्हणून नॉर्मल डिलेव्हरीसाठी कमीत कमी 10,000 व जास्तीत जास्त 20,000 पर्यंत व (CEASER) सी-सेक्शन डिलेव्हरीसाठी कमीत कमी-25,000/- व जास्तीत जास्त 40,000/- पर्यंत खर्च अनुज्ञेय राहिल.(प्रथमतः संबंधिताने शासकीय /निमशासकीय रुग्णालयात प्रसुतीसाठी प्राधान्य द्यावे. जर सदर शासकीय /निमशासकीय रुग्णालयात प्रसुती उपचारादरम्यान अडचणी निर्माण होत असल्यास त्याबाबतचे संबंधित वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्र घेऊन इतर खाजगी रुग्णालयात प्रसुती झालेल्या प्रकरणास उक्त अनुदान/अर्थसहाय्य अनुज्ञेय राहिल.) |

1) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी वैद्यकीय प्रतिपुर्ती योजनेचा लाभ घेतल्यास त्यांना हे नियम व कल्याण निधी योजना अनुज्ञेय राहणार नाही. तसेच संबंधितांचा वैद्यकीय उपचारा दरम्यान झालेल्या खर्च कमीत कमी रु.10,000/- व जास्तीत जास्त रु.40,000/- च्या वर असणे आवश्यक आहे.

2) वैद्यकीय उपचारादरम्यान झालेला खर्चाबाबतचे देयक 06 महिन्याच्या आत व जास्तीत जास्त एका वर्षातील असणे आवश्यक राहिल. कालबाहय देयके अनुज्ञेय राहणार नाही.

3) GST सह पक्के देयके सादर करणे आवश्यक आहे.

4) सदर देयके अंतररुग्ण कालावधीतील असणे आवश्यक असून कालबाहय देयके अनुज्ञेय राहणार नाही.
5) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायम अधिकारी /कर्मचारी यांना व त्यांच्या पात्र कुटुंबातील व्यक्तींना कल्याण निधी अंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय राहिल.
6) मनपा कल्याण निधी अनुज्ञेय करण्यात आलेल्या रक्कमेपैकी संबंधितांना वैद्यकीय उपचारादरम्यान झालेला खर्च कमी येत असेल, तर अशा प्रकरणी संबंधितांना सदर देयकाच्या 80% रक्कम अनुज्ञेय राहिल.

महानगरपालिका स्तरातील कर्मचा-यांच्या पाल्यांना उच्च व्यावसायिक/वैद्यकीय शिक्षणाकरीता परत फेडीच्या तत्वावर पाल्यासाठी अत्यल्प व्याज 5% दराने रु. 50,000/- कर्ज व मुलींच्या लग्नसमारंभासाठी विनाव्याजी परतफेडीच्या तत्वावर रु. 50,000/- कर्ज स्वरुपात रक्कम देण्यात येईल व मासिक वेतनाच्या समान हप्त्याने कपात करण्यात येईल.(प्रतिमहा रुपये 2292/- व 2084/- याप्रमाणे 24 समान हप्त्यामध्ये) फक्त दोन अपत्यांना लागू राहिल. (सुधारणा)

❖ **उत्पन्नाची साधने- खालील पद्धतीने निधी उभारण्यात येईल.**

1) सदर अर्थसहाय्य हे कर्मचा-यांसाठी व त्यांच्या कुटुंबीतील सदस्यांना उपयुक्त असल्यामुळे या निधी मध्ये मनपा कर्मचारी यांच्या वर्गणी व्यतिरिक्त मनपा फंडातून दरवर्षीच्या मुळ अर्थसंकल्पात रुपये 2.00 लक्षाची तरतुद करण्यात यावी.
2) महानगरपालिका कर्मचा-यांकडून मासिक वर्गणी गोळा करुन,महानगरपालिकेतील मुळ आस्थापनेवरील कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या मासीक वेतनातून खालीलप्रमाणे वर्गणी दर निश्चित करण्यात येते.

| अ.क्र. | कर्मचारी वर्ग | मासिक वर्गणीचा दर |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिकेतील मुळ आस्थापनावर कार्यरत असलेले सर्व अधिकारी | 100/- |
| 2 | सर्व पर्यवेक्षकीय पदांवरील कर्मचारी का.अ./मुख्य लिपीक/वरीष्ठ लिपीक/निरीक्षक,स्वच्छता निरीक्षक,इमारत निरीक्षक, सर्व लिपीक सर्व जकात अधिक्षक,क.अभियंता/सुपरवायझर इत्यादी वर्ग-3 चे सर्व कर्मचारी | 50/- |
| 3 | सर्व वर्ग 4 चे कर्मचारी | 25/- |

उक्त प्रमाणे कार्यकारी समिती हे मासिक वर्गणीचा दर कोणत्याही प्रकरणात कमी अथवा जास्त करु शकेल.

1.1 अध्यक्ष- महानगरपालिकेचे आयुक्त हे सदरील कल्याण निधीचे व कार्यकारी समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील किंवा आयुक्ताने प्राधीकृत केलेला अतिरिक्त आयुक्त/उपआयुक्त

1.2 सचिव- कार्यकारी समिती उपआयुक्त (प्रशासन) हे समितीचे पदसिध्द सचिव असतील.

1.3 उपसचिव-वैद्यकीय आरोग्य अधिकारी/ शिक्षणाधिकारी हे समितीचे उपसचिव असतील.

1.4 कोषाध्यक्ष- महानगरपालिकेतीचे मुख्यलेखाधिकारी हे समितीचे पदसिध्द कोषाध्यक्ष असतील.

1.5 सदस्य - महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त,प्रशासन हे समितीचे पदसिध्द उप सचिव असतील.

1.6 सदस्य- महानगरपालिकेतील वर्ग-3 व वर्ग-4 चे कर्मचारी हे समितीचे पदसिध्द सदस्य असतील.

उक्त प्रमाणे समिती गठीत करुन सदर कार्यकारी समितीचे - सचिव, उपसचिव, कोषाध्यक्ष व सदस्य यांच्या मार्फत मनपा कर्मचारी कल्याण निधी समितीचे सर्व प्रकरणे तपासून पात्र/अपात्र निश्चित करुन अंतिम मान्यतेसाठी मा.आयुक्त तथा अध्यक्ष यांच्याकडे सादर करतील. तसेच मनपा कल्याण निधी अंतर्गत विविध आजार व शस्त्रक्रियेसाठी विहित मर्यादेत अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार गठीत कार्यकारी समितीस असतील.परंतु वरील सर्व सदस्य मानसेवी असून त्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचे परिश्रमीक अथवा मानधन मिळणार नाही.

करीता नांदेड वाघाळा शहर कर्मचारी कल्याण निधी सर्वसाधारण सभा ठराव क्र.15 दि.24.05.2002 व्दारे मंजुर उपविधीत मनपा ठराव क्र.108 दि.31.08.2013 व्दारे सुधारणा उक्त ठरावामध्ये अंशत: बदल करुन सुधारीत ठराव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण महासभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.

**विषय क्रं. 02**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या मंजूर सुधारित विकास योजनेमधील मौ. जंगमवाडी मधील न.भु. क्रं. 7766 स.नं. 20/1, येथील आरक्षण क्रं. A-26 High School & Play Ground, A-27 Play Ground, A-28 Primary School & Play Ground व ईपी-19 प्रमाणे 18.0 मी. रुंद रस्ता संबंधीत सेक्रेटरी नांदेड एज्युकेशन सोसायटी नांदेड यांच्या दिनांक 31.08.2021 च्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 127 च्या नोटीसबाबत.

नांदेड शहराची मंजूर सुधारित विकास योजना शासन निर्णय क्रं. टिपीएस-3200/2043/प्र.क्र. 164-B/2000/नवि-30 दिनांक 31 जानेवारी 2004 अन्वये मंजूर केली असून त्यातील मौ. जंगमवाडी मधील न.भु.क्रं. 7766 स.नं. 20/1, येथील सेक्टर ए मध्ये खालील प्रमाणे आरक्षण प्रस्तावित आहे.

| **आरक्षण क्रं.** | **आरक्षणाचे नांव** | **आरक्षणाचे क्षेत्र** | **अर्जदाराच्या मालकीच्या जागेचे क्षेत्र (अर्जात नमूद)** | **समुचित प्राधिकरण** |
|---|---|---|---|---|
| A-26 | High School & Play | 2.13 हेक्टर | 0.88 | नावाशमनपा नांदेड |
| A-27 | Play Ground | 2.70 हेक्टर | 0.74 | नावाशमनपा नांदेड |
| A-28 | Primary School & Play ground | 0.43 हेक्टर | 0.18 | नावाशमनपा नांदेड |
| 18.0 | 18.0 मी. रुंद रस्ता | लांबी 750 मी. अंदाजे | 630 मी. लांबी क्षेत्र = 1.134 हे. | नावाशमनपा नांदेड |
| | एकूण क्षेत्र | 5.26 हेक्टर व 750 मी. लांबी | 1.80 हेक्टर व 630 मी. लांबी (क्षेत्र=1.134 हे. | |

सेक्रेटरी, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेउ यांनी दि. 31.08.2021 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 127 ची नोटीस बजावलेली आहे. सदर नोटीस बजावल्यानंतर 24 महिन्याच्या आत आरक्षणाखालील जागा संपादन करणे आवश्यक आहे. याबाबद दिनांक 22.10.2021 रोजी सुनावणी घेवून अर्जदाराचे म्हणणे एकूण घेण्यात आले असून त्यांचे पत्र दिनांक 22.10.2021 च्या पत्रान्वये सक्रेटरी नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांनी आरक्षणाखालील जागेच्या मोबदल्यात टिडीआर घेण्यास नकार दिला असून भुसंपादन दराप्रमाणे एक रक्कमी मावेजा देणेची विनंती केलेली आहे.

तरी, उक्त जागा ही विहीत मुदतीच्या आत भूसंपादन कायदयाअंतर्गत संपादन करणे बंधनकारक असून सालसन 2020-21 च्या बाजार मुल्य दर तक्ता प्रमाणे अंदाजे रक्कम रुपये 46.21कोटी इतकी जागेची किमंत येत आहे. तरी, उक्त आरक्षणाखालील जागेच्या मावेजापोटी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार लागणा-या या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**स्वाक्षरीत/-**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**